# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. 2020/प्र.क्र. 31/18 (र.व.का.) दि. 16 मार्च 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 22/03/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यातील सह दुय्यम निबंधक कार्यालय व दुय्यम निबंधक श्रेणी 1 कार्यालयांमध्ये दस्त नोंदणीकरिता नागरिकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होते व याठिकाणी दस्त नोंदणीचे कामकाजासाठी बायोमेट्रीक यंत्रणेचा वापर केला जात असल्याने करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव होऊ याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्ह्यातील सर्व सह दुय्यम निबंधक कार्यालय व दुय्यम निबंधक श्रेणी 1 कार्यालयांमध्ये होणारे दस्त नोंदणी व्यवहार दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्ह्यामधील सर्व सह दुय्यम निबंधक कार्यालय व दुय्यम निबंधक श्रेणी 1 कार्यालयांमध्ये होणारे दस्त नोंदणी व्यवहार दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद करणेबाबत आदेशित करीत आहे.**

या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन दैनंदिन अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेबाबत सह जिल्हा निबंधक, उस्मानाबाद यांना आदेशित करीत आहे.



Scanned by CamScanner

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.
4. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
5. उपविभागीय अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
6. तहसिलदार सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. दुय्यम निबंधक सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

22/3/20
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

Scanned by CamScanner